महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

**प्रकटन**

**विषय :-** फेब्रुवारी-मार्च २०२५ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेच्या ऑनलाईन प्रवेशपत्रांबाबत (Hall Ticket)...

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचेशी संलग्न असलेल्या सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांचे मुख्याध्यापक/प्राचार्य, शिक्षक, विद्यार्थी व पालक यांना सुचित करण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२५ साठी सर्व विभागीय मंडळातील विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रवेशपत्र (Hall Ticket) उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

सर्व उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांना फेब्रुवारी-मार्च २०२५ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी)परीक्षेची प्रवेशपत्रे (Hall Ticket) ऑनलाईन (Online) पध्दतीने मंडळाच्या www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर शुक्रवार दिनांक १०/०१/२०२५ रोजी Admit Card या link द्वारे download करण्याकरिता उपलब्ध होतील. या संदर्भात काही तांत्रिक अडचण उद्‌भवल्यास उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांनी विभागीय मंडळाकडे संपर्क साधावा.

ऑनलाईन प्रवेशपत्रे (Hall Ticket) उपलब्ध करून घेण्याच्या अनुषंगाने सूचित करण्यात येते की.

१. फेब्रुवारी-मार्च २०२५ साठी सर्व विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी इ.१२ वी परीक्षेची ऑनलाईन प्रवेशपत्रे प्रिंट करून विद्यार्थ्यांना द्यावयाची आहेत.
२. प्रवेशपत्र (Hall Ticket) ऑनलाईन (Online) पध्दतीने प्रिंटींग करताना विद्यार्थ्यांकडून त्यासाठी कोणतेही वेगळे शुल्क घेऊ नये. सदर प्रवेशपत्राची प्रिंट काढून त्यावर मुख्याध्यापिक/प्राचार्य यांचा शिक्का उमटवून स्वाक्षरी करावी.
३. ज्या आवेदनपत्रांना "Paid" असे Status प्राप्त झालेले आहे त्यांचीच प्रवेशपत्रे "Paid Status Admit Card" या पर्यायाव्दारे उपलब्ध होतील.
४. अतिविलंबाने आवेदनपत्रे भरलेल्या व Extra Seat No विभागीय मंडळामार्फत दिलेल्या विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे "Extra Seat No Admit Card" या पर्यायाव्दारे उपलब्ध होतील.
५. Download केलेल्या प्रवेशपत्रामध्ये नाव/आईचे नाव/ जन्मतारीख अशा दुरूस्त्या असल्यास सदर दुरूस्त्या Online पध्दतीने करावयाच्या असून त्याकरीता Application Correction ही Link उपलब्ध करून देण्यात आलेली असून विहित दुरूस्ती शुल्क भरून दुरूस्त्या विभागीय मंडळाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात याव्यात व विभागीय मंडळाच्या मान्यतेनंतर "Correction Admit Card " या Link द्वारे सुधारीत Admit Card उपलब्ध होतील. विषय/माध्यम बदल असल्यास प्रचलित पध्दतीनुसार विभागीय मंडळात प्रत्यक्ष संपर्क साधून योग्य त्या दुरूस्त्या करण्यात याव्यात.
६. ज्या आवेदनपत्रांना "Paid " असे Status प्राप्त झालेले नाही अशा आवेदनपत्रांचे शुल्क प्राप्त झाल्यानंतर त्यांचे Status Update होऊन "Late Paid Status Admit Card" या Option द्वारे त्यांची प्रवेशपत्रे उपलब्ध होतील.
७. फोटो सदोष असल्यास त्यावर विद्यार्थ्यांचा फोटो चिकटवून त्यावर संबंधित मुख्याध्यापक/प्राचार्य यांनी शिक्का मारून स्वाक्षरी करावयाची आहे.
८. प्रवेशपत्र विद्यार्थ्यांकडून गहाळ झाल्यास संबंधित उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी पुनःश्च प्रिंट काढून त्यावर लाल शाईने व्दितीय प्रत (Duplicate) असा शेरा देऊन विद्यार्थ्यास प्रवेशपत्र द्यावयाचे आहे.

तरी फेब्रुवारी-मार्च २०२५ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षेसाठी प्रविष्ट झालेले सर्व विद्यार्थी, पालक, शिक्षक, मुख्याध्यापक/प्राचार्य, सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये यांनी उपरोक्त बाबींची नोंद घेऊन त्याप्रमाणे उचित कार्यवाही करावी.

(देविदास कुलाळ)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे ४.

दिनांक : ०९/०१/२०२५

क्र.कोविमं/उ.मा./परीक्षा/ 106
दिनांक :- ०९/०१/२०२५
10 JAN 2025

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये,
जिल्हा- सातारा, सांगली, कोल्हापूर.

**विषय :-** फेब्रुवारी-मार्च २०२५ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेच्या ऑनलाईन प्रवेशपत्रांबाबत (Hall Ticket)

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) फेब्रु.-मार्च २०२५ परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशपत्रांबाबत उपरोक्त प्रकटनानुसार कार्यवाही करावी. तसेच No Candidate केलेल्या विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे संबंधित विद्यार्थ्यांना वितरीत करु नयेत. प्रवेशपत्र डाऊनलोड करण्यासंदर्भात काही तांत्रिक अडचण उद्‌भवल्यास मंडळ कार्यालयाशी संपर्क साधावा.

विद्यार्थ्यांच्या प्रवेशपत्रामध्ये विषय, माध्यम अथवा इतर कोड यामध्ये दुरुस्ती असल्यास सोबतच्या प्रपत्र नमुन्याप्रमाणे दुरुस्ती प्रस्ताव **प्रवेशपत्राच्या दोन प्रतींसह प्रती दुरुस्ती रु.२००/- शुल्क** भरुन मंडळ कार्यालयास दि.०६/०२/२०२५ पूर्वी समक्ष सादर करावा, जेणेकरुन दुरुस्ती प्रक्रिया वेळेत होईल. दुरुस्ती प्रस्ताव मंडळ कार्यालयास वेळेत प्राप्त न झाल्यास विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या नुकसानीस कनिष्ठ महाविद्यालय जबाबदार राहील याची नोंद घ्यावी.

**(सुभाष रा.चौगुले)**
**विभागीय सचिव,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**

**सोबत :-** विहित नमुन्यातील दुरुस्ती तक्ता

# प्रवेशपत्रिकेतील / कनिष्ठ महाविद्यालय यादीतील चुकांच्या दुरुस्तीसाठी कळविण्याचे प्रपत्र

To be submitted before Examination

प्रपत्र परीक्षेपूर्वी दोन दिवसांपर्यंत समक्ष सादर करणे आवश्यक आहे.

क.महाविद्यालयाचा क्रमांक :- | J | | | | | | | |

## HSC Examination of Feb.-March /July-August ____________

Proforma indicating Errors in the Seat No. wise College List of Candidates

| Sr.No. अ.क्र. | Application No. आवेदनपत्र क्र. | Seat No. बैठक क्र. | Name of Candidate विद्यार्थ्याचे नाव | Original/Incorrect Position in the College List/ Hall Ticket कनिष्ठ महाविद्यालय यादीतील/ प्रवेशपत्रिकावरील नोंद | Correct Position as per the College Record क.महाविद्यालयाच्या अभिलेखाप्रमाणे आवश्यक दुरुस्ती |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

(प्रपत्र इंग्रजीमध्ये भरणे आवश्यक आहे.)

प्राचार्य

स्थळ - ____________

दिनांक ____________